Awareness was provided to the public on World TB day. The report of celebrating the World TB Day in Marathi is compiled as under:

“

## *जागतिक क्षय रोग दिन – २४ मार्च, २०१४ निमित्त आयोजित केलेल्या “जाणीव जागृती” कार्यक्रमाचा अहवाल*

*सोमवार दिनांक २४ मार्च, २०१४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता “चाय (दि कॅथॉलिक हेल्थ असोसिएशन ऑफ इंडिया, सिकंदराबाद)” पुरस्कृत **जागतिक क्षय रोग** दिन, “ सेवा” या संस्थेच्या विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सुभाष टेकडी, उल्हासनगर-४२१ ००४, जि.-ठाणे, महाराष्ट्र या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अंदाजे २०० नागरिक उपस्थित होते ज्यामध्ये महिला, ज्येष्ठ नागरिक व युवक/युवतींचा समावेश होता. या निमित्ताने सामुदायिक सभा व नंतर पथनाट्य या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांचा सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे:*

*सुरूवातीला संस्थेच्या संचालिका सौ. अपर्णा जाधव यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना व उद्दिष्ट नमूद केले. स्थानिक ज्येष्ठ नागरिक श्री हरिश्चंद्र ढोके व अंबरनाथ नगर परिषदेच्या छाया हॉस्पिटल येथील मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आशा रायबोले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाला अर्पण केली. नंतर संस्थेच्या स्वयंसेविका व इतरांनी मिळून पुतळ्यासमोर मेणबत्तीचे प्रज्वलन केले. सामुदायिक बुद्धवंदना घेऊन सर्वांना सुखमय व निरोगी आयुष्य लाभो असे चिंतन केले. २४ मार्च या दिवसाचे महत्त्व विषद करून सौ. अपर्णा जाधव यांनी हा दिवस “क्षय रोग निवारण दिवस” म्हणून पाळावा असे उपस्थितांना आवाहन केले. नंतर सौ. प्रफुल्लता मोहोड यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहिलेले अंबरनाथ नगर परिषदेचे छाया हॉस्पिटल येथील डॉट्स विभागाचे पर्यवेक्षक श्री देशपांडे यांचे स्वागत करून उपस्थितांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना विनंती केली. श्री देशपांडे यांच्या मार्गदर्शनीय व जनजागृती संदर्भातील भाषणात त्यांनी नमूद केले की,*

> *“ आपणा सर्वांना माहीतच आहे की टी बी म्हणजेच क्षय रोग हा किती घातक आहे. भारत देशात दर दीड मिनिटाला एक माणूस क्षय रोगाने दगावतो. दररोज पाच हजार लोकांना क्षय रोगाचा संसर्ग होतो. दर वर्षी तीन ते चार लाख मुलांना शिक्षण घेता येत नाही. कारण त्यांच्या आई-वडिलांना क्षय रोग झालेला असतो. अशा मुलांचे आई वडील घरातील कुठल्यातरी कोपऱ्यात खोकत, रक्त ओकत पडून असतात. अडीच ते तीन लाख महिलांना क्षय रोगाने ग्रासले म्हणून त्यांच्या नवऱ्यांनी त्यांना घरातून हाकलून दिलेले आढळते. ही अत्यंत दयनीत स्थिती आहे. ही सत्य बाब अंबरनाथमध्ये असल्याचे आमच्या नोंदणीत आहे. अशी वेळ आपल्या जवळच्या व्यक्तींवर येऊ नये म्हणून आपण वेळीच काळजी घेतली पाहिजे. क्षय रोगाने ग्रासलेल्या महिलेला जेव्हा तिचा नवरा घरातून हाकलून देतो तेव्हा त्याला ठणकाऊन सांगितले पाहिजे की जेव्हा माणूस जन्माला येतो तेव्हा त्याच्या शरीरातच क्षयाचे जंतू असतात. परंतु ज्यांच्यामध्ये प्रतिकारशक्ती कमी असते त्यांना क्षय रोग होतो. कष्टकरी महिलांना सकस आहारच्या अभावामुळे त्यांच्यातील प्रतिकारशक्ती कमी होते व त्यांना या रोगाला बळी पडावे लागते.*
>
> *क्षय रोगाची लागण झाले हे कसे ओळखावे? तर, क्षय रोग दोन प्रकारचे असतात. एक पल्मनरी व दुसरा शरीरातील कोणत्याही एका भागाचा क्षय रोग. त्यात मणक्याचा, बगलेतील गाठीचा, कातडीचा, हाडाचा, छातीच्या बरगड्यांचा असे प्रकार आहेत. अशा या रोगावर शासनाने तीस हजारपासून दोन लाखापर्यंत मोफत उपचार सुरू केला आहे.*
>
> *दोन आठवड्यांपेक्षा जास्त दिवस खोकला लागणे, वजन एकदम कमी होणे, भूक मंदावणे, रात्री झोप न येणे अशाप्रकारची क्षय रोगाची लक्षणे आहेत. या रोगाचे निदान योग्य चाचण्या करूनच केले जाते. हा रोग झोपडपट्टीत किंवा बंगल्यात राहणाऱ्या वा गरीब श्रीमंत कोणालाही होऊ शकतो. म्हणजेच ज्याची प्रतिकारशक्ती कमजोर झाली आहे त्याला कोणालाही हा रोग होऊ शकतो.*

या रोगावर तीन प्रकारातील वर्गवारीने उपचार केले जातात. पहिल्या प्रकारात क्षय रोग बाधित रूग्णाला सहा महिन्यांच्या कालावधीसाठी रु. ३०,०००/- एवढ्या किमतीची औषधे शासन मोफत पुरविते. दुसऱ्या प्रकारात आठ महिन्याच्या उपचारासाठी रु. ४०,०००/- एवढ्या किमतीची औषधे व इंजेक्शन पुरविली जातात व तिसऱ्या प्रकारात दोन वर्षांसाठी मोफत उपचार उपचार केला जातो.

क्षय रोग झालेल्या व्यक्तीने लागण झाल्याचे जर लपवून ठेवले व उपचार घेतला नाही तर त्याचे आयुष्य उध्वस्त होवू शकते. एखाद्या व्यक्तिला साप चावला व त्याने उपचार घेतले नाहीत तर तो दगावतो. पण क्षय रोग झालेल्या व्यक्तीने ते लपवले तर तो स्वतः दगावतो परंतु आजूबाजूला जे संपर्कात आले त्या इतरांनाही त्याची लागण पसरवतो. म्हणून क्षय रोगाची लागण लपवू नये. क्षय रोगाबद्दल जी महिती आपल्याला आहे ती दुसऱ्यांना सांगा. म्हणजेच या रोगाबद्दलचे अज्ञान दूर होईल.

बदलापूर शहरात आजही या अज्ञानाचा प्रसार आहे. याचे एक अलिकडचे उदाहरण असे की एका बाळंतिणीला तिच्या नातेवाइकांनी तिच्या आठ दिवसाच्या मुलापासून दूर ठेवले होते. कारण होते, तिला क्षय रोग झाला ! आम्ही तिच्या नातेवाइकांना खूप समजावले. योग्य उपचार द्या व बाळाला तिच्याजवळ द्या. बाळाला रोगाची लागण होणार नाही. परंतु त्यांनी ते ऐकले नाही व भोंदू साधूकडून उतारा घेतला. योग्य उपचार न झाल्यामुळे ती आई दीड महिन्यात बंद खोलीमध्ये मरण पावली. ही परिस्थिती अज्ञानामुळे आली. म्हणून या रोगाबद्दल प्रचार करून जाणीव जागृती करणे हे आपले कर्तव्य आहे. ते जर पार पाडले तरच जागतिक क्षय दिन साजरा झाल्याचे सार्थक होईल. कारण औषधोपचाराने क्षय रोग १०० % बरा होतो हे लक्षात ठेवावे.

दुसऱ्या सत्राच्या कार्यक्रमात श्री हर्षल सूर्यवंशी व मित्र मंडळ यांचे पथनाट्य सादर करण्यात आले. या पथनाट्यात क्षय रोगाविषयी समाजात असलेली समज व भीती याविषयी सादरीकरण करण्यात आले. समाजात व कुटूंबात क्षय रोग्याचे स्थान, त्यांच्याकडे दुर्लक्ष कसे केले जाते, क्षय रोग असलेल्या मुलींना व महिलांना कुटूंबाकडून व समाजाकडून कसे दूर केले जाते, बऱ्याचवेळा त्यांना आत्महत्येला प्रवृत्त केले जाते हे चित्र सादर करण्यात आले. या पथनाट्यातून कलाकारांनी क्षय रोग्याची दशा सादर केली. क्षय रोगाची लक्षणे, प्रकार, उपचार यांचेही सादरीकरण करण्यात आले व शेवटी औषधोपचाराने हा आजार पूर्ण बरा होतो हा संदेश सादर केला.

हे पथनाट्य सादर करतांना काव्यपंक्ती सादर केल्या की, "हरित क्रांतीची शपथ मोठी, हरित क्रांतीची शपथ मोठी, गरीब मरतो रोगापोटी....., मग आता सांगा, एच आय व्ही? ...माहीत आहे! डायबीटीस? माहीत आहे. क्षयरोग म्हणजेच टी बी... ! क्षयरोग हा महाभयंकर रोग आहे. थुंकीतून बेडकी पडणे, रात्री ताप येणे, भूक कमी होणे, वजन ६० किलोवरून एकदम ४५ किलो होणे, चालताना थकवा येणे, छातीत दुखणे, मानेवर गाठी येणे अशी या रोगाची लक्षणे आहेत.

"सांग सांग भोलानाथ, सांग सांग भोलानाथ, क्षय रोग बरा होईल का?" बरा होईल, बरा होईल, बरा होईल......... वेळीच उपचार केला तर पूर्ण बरा होईल.

या पथनट्यातून समाज प्रबोधनात्मक जाणीव जागृती झाली.

सौ. अपर्णा जाधव यांनी उपस्थितांचे, डॉक्टर आशा रायबोले व श्री देशपांडे यांचे आभार मानून या कार्यक्रमाची सांगता केली. ”

**कार्यक्रम क्र. १ :**

*शनिवार दिनांक २१ जून, २०१४ रोजी सायंकाळी ३.३० वाजता "अक्षय" या योजनेंतर्गत कालिमाता मंदिर परिसर, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर-५ येथे मिड मेडिया कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृती सभा आयोजित करण्यात आली होती. सदरच्या कार्यक्रमात संस्थेच्या संचालिका सौ. अपर्णा जाधव, सौ. सविता दामले, सौ. सुनंदा पुंडकर, अंबरनाथ नगर परिषदेच्या छाया हॉस्पिटल येथील डॉट्स विभागाचे पर्यवेक्षक श्री देशपांडे व स्थानिक नागरिक उपस्थित होते.*

*सुरूवातीला संस्थेच्या संचालिका सौ. अपर्णा जाधव यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाची प्रस्तावना व उद्धिष्ट नमूद केले. नंतर कार्यक्रमाला उपस्थित राहिलेले अंबरनाथ नगर परिषदेच्या छाया हॉस्पिटल येथील डॉट्स विभागाचे पर्यवेक्षक श्री देशपांडे यांना उपस्थितांना मार्गदर्शन करण्यासाठी विनंती करण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनीय व जनजागृती संदर्भातील भाषणात त्यांनी नमूद केले की,*

*" आपणा सर्वांना माहीतच आहे की टी बी म्हणजेच क्षय रोग हा किती घातक आहे. भारत देशात दर दीड मिनिटाला एक माणूस क्षय रोगाने दगावतो. दररोज पाच हजार लोकांना क्षय रोगाचा संसर्ग होतो. दर वर्षी तीन ते चार लाख मुलांना शिक्षण घेता येत नाही. कारण त्यांच्या आई-वडिलांना क्षय रोग झालेला असतो. अशा मुलांचे आई वडील घरातील कुठल्यातरी कोपऱ्यात खोकत, रक्त ओकत पडून असतात. अडीच ते तीन लाख महिलांना क्षय रोगाने ग्रासले म्हणून त्यांच्या नवऱ्यांनी त्यांना घरातून हाकलून दिलेले आढळते. ही अत्यंत दयनीय स्थिती आहे. ही सत्य बाब अंबरनाथमध्ये असल्याचे आमच्या नोंदणीत आहे. अशी वेळ आपल्या जवळच्या व्यक्तींवर येऊ नये म्हणून आपण वेळीच काळजी घेतली पाहिजे. क्षय रोगाने ग्रासलेल्या महिलेला जेव्हा नवरा घरातून हाकलून देतो तेव्हा त्याला ठणकाऊन संगितले पाहिजे की जेव्हा माणूस जन्माला येतो तेव्हा त्याच्या शरीरातच क्षयाचे जंतू असतात. परंतु ज्यांच्यामध्ये प्रतिकारशक्ती कमी असते त्यांना क्षय रोग होतो. कष्टकरी महिलांना सकस आहारच्या अभावामुळे त्यांच्यातील प्रतिकारशक्ती कमी होते व त्यांना या रोगाला बळी पडावे लागते.*

*क्षय रोगाची लागण झाले हे कसे ओळखावे? तर, क्षय रोग दोन प्रकारचे असतात. एक पल्मनरी व दुसरा शरीरातील कोणत्याही एका भागाचा क्षय रोग. त्यात मणक्याचा, बगलेतील गाठीचा, कातडीचा, हाडाचा, छातीच्या बरगड्यांचा असे प्रकार आहेत. अशा या रोगावर शासनाने तीस हजारपासून दोन लाखापर्यंत मोफत उपचार सुरू केला आहे.*

*दोन आठवड्यापेक्षा जास्त दिवस खोकला लागणे, वजन एकदम कमी होणे, भूक मंदावणे, रात्री झोप न येणे अशाप्रकारची क्षय रोगाची लक्षणे आहेत. या रोगाचे निदान योग्य चाचण्या करूनच केले जाते. हा रोग झोपडपट्टीत किंवा बंगल्यात राहणाऱ्या वा गरीब श्रीमंत कोणालाही होऊ शकतो. म्हणजेच ज्याची प्रतिकारशक्ती कमजोर झाली आहे त्याला कोणालाही हा रोग होऊ शकतो.*

*या रोगावर तीन प्रकारातील वर्गवारीने उपचार केले जातात. पहिल्या प्रकारात क्षय रोग बाधित रूग्णाला सहा महिन्यांच्या कालावधीसाठी रु. ३०,०००/- एवढ्या किमतीची औषधे शासन मोफत पुरविते. दुसऱ्या प्रकारात आठ महिन्याच्या उपचारासाठी रु. ४०,०००/- एवढ्या किमतीची औषधे व इंजेक्शन पुरविली जातात व तिसऱ्या प्रकारात दोन वर्षांसाठी मोफत उपचार शासन पुरविते.*

*क्षय रोग झालेल्या व्यक्तीने लागण झाल्याचे जर लपवून ठेवले व उपचार घेतला नाही तर त्याचे आयुष्य उध्वस्त होवू शकते. एखाद्या व्यक्तिला साप चावला व त्याने उपचार घेतले नाहीत तर तो दगावतो. पण क्षय रोग झालेल्या व्यक्तीने ते लपवले तर तो स्वत: दगावतो परंतु आजूबाजूला जे संपर्कात आले त्या इतरांनाही त्याची लागण पसरवतो. म्हणून क्षय रोगाची लागण लपवू नये. क्षय रोगाबद्दल जी महिती आपल्याला आहे ती दुसऱ्यांना सांगा. म्हणजेच या रोगाबद्दलचे अज्ञान दूर होईल. बदलापूर शहरात आजही या अज्ञानाचा प्रसार आहे. याचे एक अलिकडचे उदाहरण असे की एका बाळंतिणीला तिच्या नातेवाइकांनी तिच्या आठ दिवसाच्या मुलापासून दूर ठेवले होते. कारण होते, तिला क्षय रोग झाला ! आम्ही तिच्या नातेवाइकांना खूप समजावले. योग्य उपचार द्या व बाळाला तिच्याजवळ द्या. बाळाला रोगाची लागण होणार नाही. परंतु त्यांनी ते ऐकले नाही व भोंदू साधूकडून उतारा घेतला. योग्य उपचार न झाल्यामुळे ती आई दीड महिन्यात बंद खोलीमध्ये मरण पावली. ही परिस्थिती अज्ञानामुळे आली. म्हणून या रोगाबद्दल प्रचार करून जाणीव जागृती करणे हे आपले कर्तव्य आहे. ते जर पार पाडले तरच जागतिक क्षय दिन साजरा झाल्याचे सार्थक होईल. कारण औषधोपचाराने क्षय रोग १०० % बरा होतो हे लक्षात ठेवावे.*

*सौ. अपर्णा जाधव यांनी उपस्थितांचे, श्री देशपांडे यांचे व उपस्थितांचे आभार मानून या कार्यक्रमाची सांगता केली.*

**कार्यक्रम क्र. २ :**

*बुधवार दिनांक २५ जून, २०१४ रोजी सायंकाळी ३.०० वाजता "अक्षय" या योजनेंतर्गत आय. टी. आय. उल्हासनगर-३ येथे मिड मेडिया कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृती सभा आयोजित करण्यात आली होती. सदरच्या कार्यक्रमात संस्थेच्या संचालिका सौ. अपर्णा जाधव, साद फौंडेशनचे श्री. सुरवाडकर सर व स्थानिक नागरिक उपस्थित होते.*

*सुरूवातीला संस्थेच्या संचालिका सौ. अपर्णा जाधव यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाची प्रस्तावना व उद्धिष्ट नमूद केले. नंतर कार्यक्रमाला उपस्थित राहिलेले श्री. सुरवाडकर यांना उपस्थितांना मार्गदर्शन करण्यासाठी विनंती करण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनीय व जनजागृती संदर्भातील भाषणाचा वृतांत खालीलप्रमाणे आहे.*

*"क्षय या रोगाचे प्रमाण अजूनपर्यंत वाढताना आढळून येते. त्याचे कारण असे की ताप व खोकला सतत येणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. दररोज पाच हजार लोकांना क्षय रोगाचा संसर्ग होतो. या आजारावर योग्य वेळी उपचार केला तर तो बरा होऊ शकतो. परंतु असे होत नाही. कारण तो रुग्ण योग्य वेळी तपासणी करून औषधोपचार करून घेत नाही. ही अत्यंत दयनीत स्थिती आहे. आपण एक लक्षात ठेवले पाहिजे की जेव्हा माणूस जन्माला येतो तेव्हा त्याच्या शरीरातच क्षयाचे जंतू असतात.*

*परंतु ज्यांच्यामध्ये प्रतिकारशक्ती कमी असते त्यांना क्षय रोग होतो. कष्टकरी महिलांना सकस आहारच्या अभावामुळे त्यांच्यातील प्रतिकारशक्ती कमी होते व त्यांना या रोगाला बळी पडावे लागते. या रोगाची लक्षणे अशी आहेत की दोन आठवड्यापेक्षा जास्त दिवस खोकला लागणे, वजन एकदम कमी होणे, भूक मंदावणे, रात्री झोप न येणे अशाप्रकारची क्षय रोगाची लक्षणे आहेत. या रोगाचे निदान योग्य चाचण्या करूनच केले जाते. हा रोग झोपडपट्टीत किंवा बंगल्यात राहणाऱ्या वा गरीब श्रीमंत कोणालाही होऊ शकतो. म्हणजेच ज्याची प्रतिकारशक्ती कमजोर झाली आहे त्याला कोणालाही हा रोग होऊ शकतो.*

*क्षय रोग झालेल्या व्यक्तीने लागण झाल्याचे जर लपवून ठेवले व उपचार घेतला नाही तर त्याचे आयुष्य उध्वस्त होवू शकते. क्षय रोग झालेल्या व्यक्तीने ते लपवले तर तो स्वत: दगावतो परंतु आजूबाजूला जे संपर्कात आले त्या इतरांनाही त्याची लागण पसरवतो. म्हणून क्षय रोगाची लागण लपवू नये. क्षय रोगाबद्दल जी महिती आपल्याला आहे ती दुसऱ्यांना सांगावी. म्हणजेच या रोगाबद्दलचे अज्ञान दूर होईल. म्हणून या रोगाबद्दल प्रचार करून जाणीव जागृती करणे हे आपले कर्तव्य आहे. कारण औषधोपचाराने क्षय रोग १०० % बरा होतो हे लक्षात ठेवावे.*

*सौ. अपर्णा जाधव यांनी उपस्थितांचे, श्री सुरवाडे यांचे व उपस्थितांचे आभार मानून या कार्यक्रमाची सांगता केली.*